# दोन शहरांची गोष्ट (A Tale of Two Cities): चार्ल्स डिकन्स
संक्षिप्त मराठी कथारूप अनुवादः प्रा. डॉ. बिंदुमाधव जोशी

**कथानक:** (भाग १ वरून पुढे चालू)
एके दिवशी टेल्सन बँकेच्या कार्यालयात चार्ल्स डार्नेला बोलावून एक पत्र दिले जाते. पत्र एव्हरमॉंड फॅमिलीचा जुना विश्वासू सेवक गॅबेल याचे असते. उमराव एव्हरमॉंड यांचा खून झालेला असतो. हवेलीवर जमावाने हल्ला करून ती बेचिराख केलेली असते, व त्याला पकडून तुरूंगात टाकलेले असते. नवा उमराव या नात्याने त्याने रदबदली केल्यास गॅबेलची सुटका होऊ शकते, नाहीतर त्याचा मृत्यू अटळ असतो. गॅबेलने त्याला सोडवण्याची कळकळीची विनंती केलेली असते.

डार्नेने नेहमीच सामान्य शेतकऱ्यांना मदत केलेली असते, त्यामुळे त्याची प्रतिमा त्यांच्यात चांगली असते. आपण त्यामुळे काहीही त्रास न होता गॅबेलला सोडवू शकू व परत येऊ शकू अशा विश्वासाने डार्ने कोणाचाही सल्ला न घेता फक्त एक चिट्ठी ठेवून पॅरिसकडे यायला निघतो. फ्रान्सच्या सीमेवरच त्याला "पळून गेलेला उमराव" (emigrant) म्हणून डीफार्ज अडवतो व अटक करून पॅरिसच्या तुरूंगात टाकतो.

डार्नेची चिट्ठी मिळताच सर्वजण हादरतात. डॉक्टर मॅनेट, ल्यूसी व दोन वर्षांची धाकटी ल्यूसी, आणि लॉरी डार्नेला सोडवण्यासाठी त्वरित पॅरिसमधे दाखल होतात.

लोकन्यायालयासमोर (tribunal) डार्नेची केस दाखल होते. लोकन्यायालय हा एक फार्सच असतो. त्याचे सदस्य क्रांतीकारक असतात. आरोपीविरूद्ध कोणीही तक्रार मांडावी, कोणी बचाव केला तर ठीक, नाहीतर निकाल ठरलेला - दोषी, व शिक्षाही ठरलेली - गिलोटीनवर मृत्यू, चोवीस तासात.

डॉक्टर मॅनेट आपला वीस वर्षांचा तुरूंगवास व डॉक्टर म्हणून केलेली सेवा या पूर्वपुण्याईच्या जोरावर आपला जावई चार्ल्स डार्ने याच्यासाठी रदबदली करतात व डार्नेची सुटका होते. तारीख असते २२ डिसेंबर १७९२. डार्ने घरी येतो व पत्नीला भेटतो. पण त्यांचा भेटीचा आनंद क्षणभंगूर ठरतो. दुसरे दिवशीच डार्नेला परत अटक होते. या खेपेला आरोपी असतात डीफार्ज दांपत्य व आणखी एक व्यक्ती ...

डार्नेचा मित्र सिडने कार्टन याला हे वर्तमान कळताच तो ताबडतोब पॅरिसमधे दाखल होतो. कोणालाही न भेटता तो आपली योजना ठरवतो. ("तुझ्या सुखासाठी मी केव्हाही कुठलाही त्याग करायला तयार आहे" असे त्याने ल्यूसीला दिलेले वचन वाचकांच्या लक्षात असेल). डॉक्टर मॅनेटच्या पूर्वायुष्याचा डार्नेला वाचवण्यासाठी आता फारसा उपयोग होणार नाही याची कार्टनला जाणीव असते. पूर्वीचा एक इंग्लिश हेर बरसाद (जो कार्टनचा मित्र असतो) हा आता फ्रान्समधे फ्रेंच हेर म्हणून काम करत असतो. फ्रेंच तुरूंगात त्याची ये-जा असते. त्याची मदत घेऊन कार्टन आपली योजना राबवणार असतो.

Tribunal समोर डार्नेची केस दुसऱ्यांदा येते. मादाम डीफार्ज त्यावेळी डॉक्टर मॅनेटनी तुरूंगात लिहिलेले पत्र आरोपपत्र म्हणून पुढे ठेवते. त्या पत्ररूपाने ती डॉक्टर मॅनेटनाच फिर्यादी म्हणून पुढे करते. पत्रात डॉक्टर मॅनेटनी लिहिलेले असते:

"माझ्या तुरूंगवासाचे हे १० वे वर्ष आहे. मी सुटकेबाबत आता निराश झालो आहे. माझ्या बाबतीत काय घडले ते जगाला कळावे म्हणून हा माझा पत्राचा प्रयत्न.

दहा वर्षांपूर्वी १७५५ साली माझ्या घरासमोर घोडागाडी उभी राहिली त्यातून उमराव एव्हरमॉंड व त्यांचा धाकटा भाऊ उतरले. त्यांच्या सांगण्याप्रमाणे मी ३ महिने वारंवार त्यांच्या हवेलीवर जाऊन एक सुंदर तरूण मुलगी व तिचा भाऊ यांची शुश्रूषा करत होतो. त्या भावाने मला एकदा सर्व घटना सांगितली. ती खालीलप्रमाणे:

‘उमरावांच्या भावाची त्या तरूणीवर वाईट नजर होती. एके दिवशी त्याने शेतावर जाऊन तिचे अपहरण केले; विरोध करणाऱ्या बाप व नवरा यांचा छळ करून जीव घेतला; तिच्या धाकट्या भावाला पोटात तलवारीचा वार करून जबर जखमी केले. हवेलीवर त्या तरूणीला आणून तिच्यावर अनेकवेळा बलात्कार केला.’

माझ्या ३ महिन्यांच्या परिश्रमानंतरही माझ्यासमोरच त्या भावाबहिणींचा मृत्यू झाला. ती तरूणी शेवटपर्यंत सारखी ’माझे वडिल, माझे पती, व माझा भाऊ’ असा जप करत विव्हळत होती.

मला हे प्रकरण कळले असल्यामुळे लाच व धाक या दोन्हींचा उपयोग करून उमराव एव्हरमॉंडनी माझा आवाज बंद करण्याचा प्रयत्न केला. मी न्यायखात्याला लिहिलेले सविस्तर पत्र त्यांच्या हातात पडले व दोन दिवसांनी ते दोघेजण माझ्या घरी आले. ते पत्र फाडून मला जबरदस्तीने पकडून बॅस्टाईलच्या तुरूंगात ’१०५ उत्तर मनोरा’ या अंधारकोठडीत आणून डांबले, ना चौकशी ना तक्रार करण्याचा मार्ग. १० वर्षे मी या कोठडीत खितपत काढले आहेत. या अन्यायाबद्दल व त्यांनी केलेल्या शेतकरी कुटुंबावरील जुलुमाबद्दल परमेश्वराने या सर्व एव्हरमॉंड कुटुंबाचा असाच छळ करावा अशी माझी प्रार्थना आहे (I condemn the Evermond family to perpetual torture)."

हे डॉक्टर मॅनेटचे पत्र न्यायालयात वाचले जाते. ते ऐकल्यावर डॉक्टर मॅनेटची वाचाच बंद होते. कारण त्यांनी स्वतःच डार्नेच्या (जो खरा एव्हरमॉंड असतो) सुटकेचा मार्ग आपल्या पत्राद्वारे बंद केलेला असतो. कार्टन एकंदर परिस्थिती ओळखून बाहेर पडतो. न्यायालय डार्नेची केस फेटाळून लावते व त्याला २४ तासात गिलोटीनची शिक्षा फर्मावते. फिरतफिरत कार्टन डीफार्जच्या बारमधे येतो. डीफार्ज नवरा बायको इतर सहकाऱ्यांशी बोलत असतात. मादाम डीफार्जला एव्हरमॉंड कुटुंबाबद्दल का व किती द्वेष आहे याची माहिती त्यांचे बोलणे ऐकून कार्टनला होते. मादाम डीफार्ज ही डॉक्टर मॅनेट यांच्या पत्रातील शेतकरी कुटुंबातील एकमेव वाचलेली धाकटी बहीण थेरेसा

असते. तिलाही साहजिकच एव्हरमॉंड कुटुंबाविषयी चीड असते, व तिने ते कुटुंब पूर्णपणे निर्वंश करण्याचा निश्चय केलेला असतो. या इराद्यामधे कोणीही अगदी वारा आणि अग्नि (wind and fire) आडवे आले तरी ती बदलणार नसते. तिचे बोलणे ऐकल्यावर ल्यूसी, तिची मुलगी, व डॉक्टर मॅनेट हे सर्वच संकटात आहेत (कारण ते आता डार्नेशी संबंधित असतात) याची कल्पना कार्टनला येते. आपली योजना ताबडतोब अमलात आणायचे ठरवून कार्टन ती जागा सोडतो.

संध्याकाळी तो बँकेचे लॉरी यांना भेटतो. ल्यूसी वगैरे सर्वांवर आलेल्या संकटाची त्यांना जाणीव देतो व दुसऱ्या दिवशी दुपारी दोन वाजता घोडागाडीने त्या सर्वांना लंडनला घेऊन जाण्याची लॉरींना विनंती करतो. फ्रान्स हद्द ओलांडण्याचे आपले एक्झिट पर्मिट (exit permit) लॉरींच्या हवाली करून पूर्णतः गुप्तता बाळगण्यास सांगतो.

त्याच रात्री उशीरा बरसादच्या मदतीने कार्टन डार्नेच्या कोठडीत प्रवेश करतो, डार्नेला अमली पेय पाजून बेशुद्ध करतो, त्याचे कपडे आपण व आपले कपडे त्याला अशी अदलाबदल करून डार्नेला बरसादबरोबर कोठडीबाहेर पाठवतो व स्वतः त्याची जागा घेतो. (दोघांच्या चेहरेपट्टीत साम्य असल्याचे वाचकांच्या लक्षात असेल.)

दुसऱ्या दिवशी कोणालाच याची माहिती होत नाही. बेशुद्ध डार्ने सर्वांच्या बरोबर दोन वाजता कार्टनच्या प्रवेशपत्राच्या साहाय्याने फ्रान्सची हद्द ओलांडतो व लंडनकडे रवाना होतो.

बरोबर त्याचवेळी मादाम डीफार्ज (म्हणजेच थेरेसा) ल्यूसी व इतरांना पकडून त्यांच्यावर आरोपपत्र ठेवण्याच्या इराद्याने ल्यूसीच्या घरी येते, पण पक्षी उडून गेलेले असतात. संतापलेल्या थेरेसाला ल्यूसीची इमानी इंग्लिश नर्स मिस् प्राईस अडवते. दोघींच्या झटापटीत थेरेसा मारली जाते.

संध्याकाळी ५ वाजता डार्नेच्या जागी सिडने कार्टन निर्भयपणे गिलोटीनला सामोरा जातो. त्याच्या बरोबर असलेल्या भयभीत झालेल्या एका मुलीला तो आधार देतो. मावळत्या सूर्याचे किरण त्याच्या चेहऱ्यावर पडलेले असतात. त्याचवेळी डार्ने व कुटुंबियांनी फ्रान्स हद्द सुरक्षितपणे ओलांडलेली असते.

सबंध कादंबरीमधे राज्यक्रांतीच्या कुठल्याही महत्त्वाच्या घटनेचा किंवा व्यक्तीचा थेट उल्लेख लेखकाने केलेला नाही, पण राज्यक्रांतीचे भीषण सावट उत्तरार्धात जाणवत राहाते, वाचकांनाही भयभीत करत राहाते.

ooooo-----ooooo

आपल्या प्रतिक्रिया/सूचना कळवाः
Phone: 020-25881194, 98811-49755
Email: joshi.bindumadhav@gmail.com